**नि.दि.दावा क्र. १३६४/२०१२**
**मानिकलाल -वि.- एम.एस.ई.डी.सी.एल.**
**नि.क्र. २८**

**<u>वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. आर. एस. अकबानी यांच्यातर्फे शपथेवर सुरु.</u>**

हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील पत्रव्यवहार मी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या पत्रांवर माझ्या सह्या नाहीत. सर्व पत्रांवर माझ्या सह्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील सर्व पत्र माणिकलाल सिंघी यांच्या नावाने देण्यात आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही पत्रावर माझे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पत्रांवर माणिकलाल तर्फे सह्या केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही पत्रांवर माणिकलाल यांची सही नाही. माणिकलाल यांना लिहीता-वाचता येत होते. ते नागपूर येथे राहत नसल्याने त्यांनी सह्या केल्या नाहीत.

दाव्यातील नि.क्र. ८७ वरील माणिकलाल याच्या मुखत्यार पत्रावर त्याचा पत्ता धरमपेठ, नागपूर असा नमुद आहे. दाव्यात देखील त्यांचा पत्ता धरमपेठ, नागपूर असा नमुद आहे. दावा दाखल करतांना मी मुखत्यार पत्र सादर केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा दाखल करतांना मुखत्यारपत्र सादर केले नव्हते. मी मुखत्यारधारक या नात्याने दावा दाखल केल्याचा उल्लेख वाद पत्रात नाही. दाव्यात तसा उल्लेख का नाही, याचे कारण मी सांगु शकत नाही. माणिकलाल हे १९६४ सालापावेतो नागपूर येथे राहत होते. ज्या ईमारतीत विद्युत मिटर जोडण्यात आले आहे ती ईमारत श्री. जी.बी. राघवन यांच्या नावे आहे. माणिकलाल यांनी सन १९६४-१९६५ साली नागपूर सोडले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन १९६४-६५ सालापासुन माणिकलाल प्रतिवादीचा ग्राहक नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर माणिकलाल यांनी त्या मिटरचा वापर केलेला नाही. त्यानंतर आमच्या कुटुंबाने विजेचा वापर केलेला आहे. माझ्या कुटुंबात माझे आई-वडील, माझी पत्नी, माझी मुलं व माझ्या लहान भावाची मुलं आहेत.

**प्रश्न -** माणिकलाल गेल्यावर तुम्ही विद्युत मिटर तुमच्या नावार करुन घेतले नाही.

**उत्तर-** आम्ही प्रयत्न केला होता परंतु प्रतिवादीने तसे केले नाही.

त्याबाबत मी कधिही प्रतिवादीस पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मिटर वर्ग करण्याकरिता प्रयत्न केल्याचे मी खोटे सांगत आहे. वादातील मिटर १९६७ सालात जोडण्यात आले होते.

**प्रश्न-** माणिकलाल गेल्यानंतर त्याच्या नावाने मिटर का घेतले ?

**उत्तर-** मिटर पुर्वीपासुन माणिकलाल यांच्या नावावर होते.

हे म्हणणे खरे नाही की, वादातील मिटर १९६७ साली जोडण्यात आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेखानुसार ते मिटर १९७२ साली जोडण्यात आले आहे. मी प्रतिवादींसोबत जे काही पत्रव्यहवार केले होते त्यात मी माणिकलाल यांचा मुखत्यारधारक आहे असा उल्लेख केला नव्हता.

**साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**समक्ष,**

**नागपूर**
**दिनांक – ०४/०२/२०२५.**

**(एम.बी. असीजा)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**नागपूर**